I O प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** धाराशिव सिटी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0318 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/07/2025 22:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 17/06/2025
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/06/2025
**Time From (वेळेपासून):** 21:03 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/07/2025 **Time (वेळ):** 21:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 045
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/07/2025 21:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पोलीस ठाणे, उस्मानाबाद शहरचे,परिसर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): महेश युवराज तेरकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2001

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गावसुद, ता जि धाराशिव, ,ता जि धाराशिव, ,धाराशिव सिटी,धाराशिव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गावसुद, ता जि धाराशिव, ,ता जि धाराशिव, ,धाराशिव सिटी,धाराशिव, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8766963294

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोबीन नवाज शेख | | | 1. पोलीस ठाणे, धाराशिव शहर, अमतनगर, पोल्ट्री समोर, धाराशि,धाराशिव सिटी, धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 01.07.2025

मी महेश युवराज तेरकर, वय 24 वर्ष, व्यवसाय शिक्षण, बी.फार्मसी, तेरणा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, धाराशिव, रा.गावसुद, ता.जि. धाराशिव, मोबाईल नंबर 8766963294

मी दिनांक 17.06.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे आपले समक्ष हजर येऊन तक्रार दिली होती की, मौजे गावसुद येथे शेतजमीनीचे बांधाचे कारणावरुन झालेल्या भांडण तक्रारीमध्ये मी, माझे वडील व भाऊ योगेश यांचे विरुध्द धाराशिव शहर पोलीस ठाणे येथे दिनांक 04.04.2025 रोजी गुरनं 146/2025 कलम 118(1), 115(2), 352, 351(2), 3(5) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचे तपासिक अंमलदार पोलीस हवालदार मोबीन शेख यांनी आम्हा तिघांना गुन्हयात अटक करीत नाही म्हणुन त्यावेळी माझेकडे 3,00,000/- रुपयाची मागणी केली होती. मी व माझा भाऊ शिक्षण घेत असल्याने नाईलाजास्तव मी पोलीस हवालदार मोबीन शेख यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना दिनांक 08.04.2025 रोजी दुपारी 01.00 वा.चे सुमारास 3,00,000/- रुपये दिले होते. सदर भांडण तक्रारीचे वेळी घटनास्थळी माझा भाऊ व वडील हे हजर नसताना देखील राजेंद्र लोकरे यांनी तक्रारीमध्ये माझे वडील व भावाचे नाव घातल्याने त्यांचेविरुध्द खोटा गुन्हा दाखल झाला आहे. तसेच माझा भाऊ योगेश हा पोलीस भरतीची तयारी करीत असल्यामुळे मी व माझा भाऊ योगेश असे मागील एक महिन्यापुर्वी पोलीस ठाणे धाराशिव येथे जावुन पोलीस हवालदार मोबीन मोबीन शेख यांची भेट घेतली होती. तेव्हा त्यांनी भाऊ योगेश याचे नाव गुन्हयातुन कमी करण्यासाठी तुमच्या विश्वासातील साक्षिदारांना घेवुन ये, त्यांचे आपण जबाब घेवू , त्यासाठी ü 5,00,000/- रुपये दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे पैश्याची मागणी केली. त्यामुळे त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी म्हणुन तक्रार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 17.06.2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब नरवटे यांनी पोलीस हवालदार मोबीन शेख हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत पडताळणी करणेकरीता शासकीय पंचांना बोलावुन घेतले. त्यानंतर मला व पंच क्र. 1 महेश सर्जे यांना योग्य त्या सुचना देऊन हवालदार मोबीन शेख यांची पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे समक्ष भेट घेण्यासाठी पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर लाचमागणी पडताळणी पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिल्यानंतर मी व पंच क्रं.01 महेश सर्जे असे माझेकडील मोटार सायकलवरुन पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे जावुन हवालदार मोबीन शेख यांना भेटलो. त्यावेळी हवालदार मोबीन शेख व माझेत माझे भावाचे नाव गुन्हयातुन कमी करण्याचे अनुषंगाने बोलणे झाले. दरम्यान आमचेत पैश्याचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी मी त्यांना आपलही मिटवलं असतं.. मग ती काय तोडगा काढला असता.. एकदाच काय तोडगा काढुन टाकु.. किती डायरेक्ट फायनल असे म्हणालो.. तेव्हा त्यांनी सांग की असे म्हणाले.. तेव्हा मी त्यांना किती , डायरेक्ट फायनलच करु आज. ते लयचं व्हायला लागलेत.. तेव्हा त्यांनी अरं सांगितलयं की.. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पाच ,पाच लाख रुपये काहीतरी कमी जास्त करा.. असे म्हणालो. त्यानंतर त्यांनी चालतंय बोलतो मी साहेबाला.. विचारुन .. मी तेवढं सांगितलयं चार पर्यत झालेल होतं. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना चार लाखा पर्यत असे म्हणालो. तेव्हा त्यांनी हं.. झालेली होती.. गेल्यावेळेस असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना तुम्ही चार लाख म्हणता असे म्हणालो असता त्यांनी हं.. असे म्हणुन हवालदार मोबीन शेख यांनी माझेकडे पाच लाख रुपयाची मागणी करुन तडजोडअंती चार लाख रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर चार लाख रुपयामध्ये आणखी काही कमी जास्त होते किंवा नाही हे साहेबांना विचारुन सांगतो असे म्हणाल्याचे देखील निष्पन्न झाले. सदर लाचमागणी पडताळणी कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दिनांक 19.06.2025 रोजी धाराशिव येथे आर.पी.कॉलेजचे बाजुला सुरक्षित ठिकाणी थांबुन पंचासमक्ष पोलीस हवालदार मोबीन शेख यांना फोन केला असता त्यांना माझा कसलातरी संशय आल्याने त्यांनी फोन बंद

केल्याचे दिसुन आले. त्यानंतर दिनांक 20.06.2025 रोजी बायपास रोड, सांजा चौक, धाराशिव येथे सुरक्षीत ठिकाणी थांबुन पंचासमक्ष पोलीस हवालदार मोबीन शेख यांना फोन केला असता, त्यांचा फोन लागला व आमचेत कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. तसेच पोलीस हवालदार मोबीन शेख यांनी सोमवारी भेटु असे सांगितले. फोनवर झालेल्या संभाषणावरुन पोलीस हवालदार मोबीन शेख यांना माझेवर कसलातरी संशय आल्याचे दिसुन आले.
त्यानंतर दिनांक 23.06.2025 रोजी धाराशिव येथे आर.पी.कॉलेजचे बाजुला सुरक्षित ठिकाणी थांबुन पंचासमक्ष पोलीस हवालदार मोबीन शेख यांना फोन केला असता, त्यांनी पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे भेटण्यासाठी बोलविले. त्यावरुन पोनि बाळासाहेब नरवटे साहेब यांनी मला व पंच क्र. 1 महेश सर्जे यांना योग्य त्या सुचना देऊन हवालदार मोबीन शेख यांची पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे समक्ष भेट घेण्यासाठी पाठवुन पुन्हा लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर लाचमागणी पडताळणी पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिल्यानंतर मी व पंच क्रं.01 महेश सर्जे असे माझेकडील मोटार सायकलवरुन पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे जावुन हवालदार मोबीन शेख यांना भेटलो. त्यावेळी हवालदार मोबीन शेख व माझेत माझे भावाचे नाव गुन्हयातुन कमी करण्याचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी पोलीस हवालदार मोबीन शेख यांनी माझेकडे संशयाचे नजरेने बघितले. तसेच पंचाकडे देखील संशयाने बघत होते. तेव्हा त्यांनी माझे भावाचे नाव गुन्हयातुन कमी करता येणार नाही असे सांगितले.
त्यानंतर दिनांक 25.06.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथुन पोलीस हवालदार मोबीन शेख यांना फोन केला असता, त्यांचा फोन बिझी आला. त्यानंतर लागलीच त्यांचा फोन आला. तेव्हा त्यांना मागच्या वेळेस तुम्ही सांगितले प्रमाणे चार लाखाचा बंदोबस्त झालाय, ती भैयाच नाव काढतो म्हणुन म्हणाला होतो, ॲडजस्टमेंट झालय असे म्हणालो. तेव्हा त्यांनी बिलकुल नाही सांगितले असे म्हणुन त्यांनी बोलणे टाळले व पैसे स्विकारण्यास नकार दिला.
यावरुन माझी, नरवटे साहेब व दोन्ही पंचांची खात्री झाली की, पोलीस हवालदार मोबीन शेख यांना माझा किंवा पंचाचा संशय आल्याने ते माझेकडे पैश्याचे अनुषंगाने काहीही बोलत नाहीत. तसेच ते यापुढे देखील माझेकडे मागणी केलेले 4,00,000/- रुपये स्विकारणार नाहीत.
त्यानंतर आज दिनांक 01.07.2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे हजर असताना, नरवटे साहेब, सापळा पथक, व पंच असे पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे जावुन पोलीस हवालदार मोबीन शेख यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले. त्यानंतर नरवटे साहेब यांनी पोलीस हवालदार मोबीन शेख यांना लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे आणले. तेव्हा नरवटे साहेब यांनी पोलीस हवालदार मोबीन शेख यांना स्वत:चा परिचय देवुन त्यांना त्यांचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव मोबीन नवाज शेख, पोहेकॉ/ 1131, वय 41 वर्ष, पोलीस ठाणे, धाराशिव शहर, रा.अमृतनगर, पोल्ट्री समोर, धाराशिव असे सांगितले. त्यानंतर नरवटे साहेब व सापळा पथकाने पुढील कार्यवाही केली.
तरी दिनांक 17.06.2025 रोजी लोकसेवक मोबीन शेख यांनी माझेकडे माझा भाऊ योगेश तेरकर याचे नाव गुन्हयातुन कमी करण्यासाठी पंचासमक्ष 5,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 4,00,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले आहे. म्हणुन मोबीन नवाज शेख, पोहेकॉ/ 1131, वय 41 वर्ष, पोलीस ठाणे, धाराशिव शहर, रा.अमृतनगर, पोल्ट्री समोर, धाराशिव यांचेविरुध्द माझी फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करुन, त्यांची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली, ती मी वाचुन पाहिली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

13\. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SHAKIL SHAIKH LAL SHAIKH(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15\. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SHAKIL SHAIKH LAL
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे,धाराशिव (